# आता पुरे !

ह्या गंधवेड्या जीवनाचे उमलणे आता पुरे ।
काटा बनुनि अंतरी सलणे मजला पुरे ।
नेत्रातल्या श्रावणसरीचे बहकणे आता पुरे ।
क्षण इंद्रधनूचे रंग बनूनि रंगणे मजला पुरे ।
स्पर्शातल्या त्या सागराचे उसळणे आता पुरे ।
हातात आल्या शिंपल्याचे वाण गे मजला पुरे ।
शब्दांतल्या त्या स्पंदनांचे धडकणे आता पुरे ।
श्वासातला हुंकार बनूनि प्रकटणे मजला पुरे ।
रसलुब्ध भ्रमरासम सखे आवेगणे आता पुरे ।
दंव पाकळ्यांचे होऊनि मिटणे प्रवाही मज पुरे ।

– जयंतकुमार त्रिभुवन
('साहेर छाया' या काव्यसंग्रहातून)